# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ०७.१०.२०२५ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, ड्रंकन ड्राईव्ह कायद्या अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०६.१०.२०२५ रोजी नागपूर शहर पोलीसांनी, सर्व पोलीस ठाणे हद्दीत **महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ०३ केसेस तसेच, एन.डी.पी.एस कायद्यान्वये ०२ केसेस असे एकुण ०५ कसेसेमध्ये ०५ ईसमावर कारवाई करून रू. ११,९१०/— चा** मुद्देमाल जप्त केला. **महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये ०३ केसेसमध्ये ०९ ईसमावर कारवाई करून रू. ९,३०५/— चा** मुद्देमाल जप्त केला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकुण १,३५८ वाहन चालकांवर कारवाई करून एकूण रू. ४,९०,६००/— रू. तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग पोलीसांची कामगिरी :— देहव्यवसाय करवुन घेणाऱ्या आरोपींविरूध्द कारवाई.**

मा. पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतून मानवी तस्करी व व्यवसायीक लैंगीक शोसनाची जाळी उखडून टाकण्याच्या उद्देशाने नागपूर शहरात सुरू असलेल्या **"ऑपरेशन शक्ती अंतर्गत"** दिनांक ०६.१०.२०२५ चे १७.३० वा. ते २२.२५ वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभागाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, त्यांनी पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत प्लॉट नं. १५, ब्रम्हविद्या सोसायटी, नरसाळा रोड, हुडकेश्वर, नागपूर येथे रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी क्र. १) सुशीलकुमार लालसिंग ठाकूर वय ३७ वर्ष रा. चूनाभट्टी, विवेकानंद नगर, नागपूर २) शोभा श्यामराव शेंडे वय ४५ वर्ष रा. कार्पोरेशन शाळेजवळ, हनुमान नगर, नागपूर हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता ग्राहकांना देहव्यापाराकरीता जागा उपलब्ध करून पिडीत महिलेकडुन देहव्यवसाय करवुन घेताना समक्ष मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन ०१ पिडीत महिलेची सुटका करण्यात आली. आरोपीचे ताब्यातुन रोख १,५००/—रू., ०२ मोबाईल फोन, होन्डा गाडी क्र. एम. एच ४० बि.डी ९७२८ व ईतर साहित्य असा एकुण किंमती अंदाजे १,०६,५२०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींचे विरूध्द पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे कलम १४२(२)(३) भा.न्या.सं., सहकलम ३,४, ५ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कारवाई कामी हुडकेश्वर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. राहुल शिरे, पोहवा. प्रकाश माथनकर व पथकाने केली.

## (गुन्हे)

**१) पोलीस ठाणे गिट्टीखदान :— आत्महत्येस प्रवृत्त करणारे आरोपींना अटक.**

दिनांक १५.०४.२००९ रोजी फिर्यादीच्या मुलीचे रितीरीवाजाने आरोपी सोबत लग्न झाले होते. फिर्यादीची मुलगी नामे सौ. अर्चना नितीन पाटील वय ४५ वर्ष, हिला मुलबाळ होत नाही याकारणावरून आरोपी क्र. १) नितीन दिनकर पाटील वय ४५ वर्ष २) श्रीमती शारदा दिनकर पाटील वय ६५ वर्ष सर्व रा. प्लॉट नं. ३०२, लियो पॅराडाईज, गोकूल सोसायटी, बोरगाव, नागपूर हे फिर्यादीचे मुलीस नेहमी शिवीगाळी, मारपीट करून भांडण करीत होते. तसेच तिला आरोपी क्र. २ ही टोमणे मारून नेहमी अपमानास्पद वागणुक देवून तिला शारीरिक व मानसिक त्रास देत होते. आरोपींचे शारीरिक व मानसिक त्रासाला कंटाळून, दि. १६.०९.२०२५ चे १८.४० वा. चे सुमारास, फिर्यादीचे मुलीने राहते घरी बेडरूम मध्ये सिलींग फॅनला, नायलॉन दोरीचे सहाय्याने, गळफास घेवुन आत्महत्या केली. तिला आरोपींनी आत्महत्या करणेस प्रवृत्त केले अशा फिर्यादी कृष्णत गणपत हरगुडे वय ७१ वर्ष रा. प्रथमेश हाऊसिंग सोसायटी, सेक्टर क्र. ५, एरोली, नविन मुंबई यांनी दिलेल्या तक्रारीवरून तसेच अकस्मात मृत्यूचे चौकशीअंती पोउपनि. पठान ९९२३१४०७३४ यांनी आरोपीविरूध्द कलम १०८ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे लकडगंज :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०५.१०.२०२५ चे ११.०० वा. ते २२.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत, प्लॉट नं. १६०, वर्धमान नगर, वैष्णोदेवी चौक, नागपुर येथे राहणारे फिर्यादी गुलशन दिगंबर काळे, वय २७ वर्षे, हे त्यांचे राहते घराला कुलुप लावुन परिवारासह नातेवाईकाचे घरी कार्यक्रमाकरीता वणी, जी. यवतमाळ येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडीकोंडा तोडुन, घरात प्रवेश करून बेडरूम मधील लाकडी आलमारीतील रोख १,०७,०००/—रू., व सोन्याचे वेगवेगळे दागिने वजनी २३.५ ग्रॅम असा एकुण २,७१,५००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी सि.सी.टी.व्ही चेक केले असता, २१.४५ वा. चे सुमारास तिन ते चार अज्ञात आरोपी चोरी करतांना दिसुन आले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे पोउपनि. सरकटे ९६६५३८४८३२ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(४), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## (अकस्मात मृत्यु)

**पोलीस ठाणे गणेशपेठ** :— दिनांक ०६.१०.२०२५ चे २३.१० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत एक अनोळखी ईसम वय अंदाजे ४० वर्ष, वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने गणेशपेठ पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता मेसो हॉस्पीटल, वार्ड क्र. ३१, येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दि. ०७.१०.२०२५ चे ०१.०० वा. चे सुमारास डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे पोउपनि. नुलगोंडावार यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

## (ईतर)

**मा. न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा/समन्स प्रसिध्द केला आहे. आरोपीं/ साक्षदारांनी नमुद तारखेपर्यंत मा.न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टचे नाव | केस क्र. | कलम | नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. अति. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०२०००६८ /२००० | कलम ४५४, ३८० भा.दं.वी. | रमेश महावीर वर्मा, रा. प्लॉट नं. ६, नर्मदा कॉलोनी, सदर, नागपुर. | १०.१०.२०२५ |
| २. | मा. अति. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०२०००५२ /२००२ | कलम ३२४, ३४ भा.दं.वी. | १) जितू उर्फ मनोज सुरेश लोनारे, रा. कैलास नगर, प्लॉट नं. ६, अजनी, नागपूर २) विनोद पंजाबराव आवारे वय २८ वर्ष रा. बजरंग नगर, अजनी, नागपूर ३) हुसैन उर्फ बालू चिरकूट नरांजे वय २२ वर्ष रा. न्यू कैलास नगर, अजनी, नागपूर | १०.१०.२०२५ |

स्वा/—
**(अंकुश उ. राठोड)**
**पोलीस उप—निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**